**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एल्फिन्स्टन, मुंबई ४०००१३

दूरध्वनी क्रमांक: २४३०६७१७/२४२२७७५८/२४३६०७३८


जा.क्र.: गपका/कार्य/२०११-१२/८२६ दिनांक : २६.७.११

## परिपत्रक

विषय :- मंडळाच्या कल्याणकारी योजनेत अपंग व्यक्तींना द्यावयाच्या सवलती बाबत.

संदर्भ :- १) अपंगव्यक्ती (समान संधी,हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५मधील तरतूदी नुसार अपंग कल्याण कार्यासाठी ३ टक्के निधी राखून ठेवण्याबाबतचे शासननाचे पत्र क्र.संकिर्ण -०७११ / प्र.क्र.३७/कामगार-१.

२)मा.अध्यक्ष महोदयांनी मान्य केलेली दि.१८.७.११ रोजी टिप्पणी.

शासनाचे वरील संदर्भिय क्र.१ पत्राच्या अनुषंगाने मंडळाच्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते कि, महाराष्ट्र राज्यातील अपंग व्यक्तींसाठी शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनेत ३ टक्के निधी राखून ठेवावा,तसेच त्यांना नोकरीमध्ये त्यांना ३ टक्के आरक्षण ठेवावे,अशा प्रकारचे शासनाचे धोरण आहे. त्या प्रमाणे प्रत्येक खाते प्रमुखाने कार्यवाही करावी अशा प्रकारच्या सुचना मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी सर्व विभागांना दिल्या आहते. त्याच प्रमाणे याबाबत मंत्रालयातील कामगार उद्योग, ऊर्जा विभागाचे कक्ष अधिकारी यांनी संदर्भिय पत्रानुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला देखील अंपग व्यक्तींबदल कार्यवाही करावी असे कळविले आहे.

शासनाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला देखील राज्यातील अपंग व्यक्तींच्या कल्याणसाठी कार्य करणे आवश्यक आहे. मंडळाच्या योजनांचा अपंगांना लाभ व्हावा यासाठी कार्यक्रम शाखेतर्फे काही शिफारशी मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या होत्या त्यापैकी खालील काही शिफारशी मा.अध्यक्ष महोदयांनी मान्य केलेल्या आहेत. खालील प्रमाणे शिफारर्शीची अमंलबजावणी त्या त्या विभाग प्रमुखांना करावी.

१) मंडळाच्या शिष्यवृत्ती योजनेमध्ये कामगार कुटुंबातील अपंग विद्यार्थ्यांचा अर्ज प्राप्त झाल्यास त्याचा स्वतंत्र विचार करुन त्यास शिष्यवृत्ती दिली जावी.

२) अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे काही निकष खालील प्रमाणे शिथिल करण्यात यावे.

अ) टक्केवारीची अट घालू नये.

ब) गुणानुक्रमे / मेरीट विचार न करता प्राप्त होणाऱ्या अर्जास सरसकट अपंग कोट्यामधून शिष्यवृत्ती मंजूर करावी.

क) अपंगाचे मंजूरीपत्रक विभागस्तरावर वेगळे काढले जावे.त्यांचा समावेश

Scanned by CamScanner

३) पाठयपुस्तक सहाय्यता योजनेमध्ये कामगार कुटुंबिय अपंग विदयार्थ्यास ५० टक्क्यां ऐवजी १०० टक्के अनुदान देण्यात यावे.

४) MS – CIT योजनेमध्ये ५० टक्क्या ऐवजी कामगार कुटुंबिय अपंग विदयार्थ्यास १०० टक्के फी ची परिपूर्तता करण्यात यावी.

५) मंडळाच्या परदेश शिक्षण शिष्यवृत्ती,क्रिडा शिष्यवृत्ती या मध्ये अर्ज प्राप्त झाल्यास त्यांचा प्राधान्यक्रम देवून विचार करण्यात यावा.

६) मंडळाच्या अर्थ संकल्पात ३ टक्के राखीव निधी ठेवण्यापेक्षा आहे. त्याच योजने मधून त्यांना लाभ देण्याचा प्रयत्न केला जावा.

७) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने कामगार कुटुंबातील अपंग व्यक्तींना लाभ देण्याचे ठरविले आहे. या बाबतचा प्रचार व प्रसिद्धी त्या त्या विभाग स्तरावर करण्यात यावी.

वरील प्रमाणे ज्या शिफारशी मा.अध्यक्ष महोदयांनी मान्य केलेल्या आहेत. त्या मधील अनु.क्र. १ ते ५ पर्यंतच्या शिफारशी नुसार मंडळाचा कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार कुटुंबातील अपंग व्यक्तीं (कामगारांची मुलगी / मुलगा किंवा दोन्ही असल्यास ) यांना लाभ देण्यात यावा.

सदर योजनाचा लाभ पुढील आदेश निघेपर्यंत देण्यात यावा. अधिकाअधिक अपंग व्यक्तींना मंडळाच्या सोयीसुविधांचा लाभ देण्यात यावा.

(स्वाक्षरी)
कल्याण आयुक्त

प्रत,

१) सहायक कल्याण आयुक्त,म.का.मुंबई
२) सहाय्यक कल्याण आयुक्त,वि.का.ठाणे / मुंबई / नाशिक / पुणे / नागपूर
३) म.सहाय्यक कल्याण आयुक्त,वि.का. अकोला / औरंगाबाद.
४) कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये.(१८)
५) कल्याण आयुक्तांचे स्विय सहाय्यक.मुंबई.
६) सर्व केंद्र प्रमुख.
७) प्रसिध्दी विभाग,म.का.मुंबई.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner